**विभागीय कार्यालय क्र. २**
**कै.ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय (बां.नि.)**
**पुणे महानगरपालिका.**
**जावक क्र. :**
**दिनांक :**

**मा. कामगार कल्याणाधिकारी,**
पुणे महानगरपालिका

**विषय :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ६० (अ) (३) अन्वये जाहीर करावयाची इकडील कार्यालयाकडील माहिती.

**संदर्भ :** १. पत्र जावक क्र. ४९६ दि.२३/०३/२००९.
२. पत्र जा.क्र. अतिमआ (वि)/३५ दि.०४/०५/२००९.
३. जावक क्र. अतिमआ(वि)/सका/१९८ दि.३१/०५/२०१०

विषयांकित प्रकरणी इकडील कार्यालयाकडील माहिती खालीलप्रमाणे :

| क्र | | कलम ६० (अ) (३) | माहिती |
|---|---|---|---|
| १. | | महानगरपालिकेला पुढील माहिती करणे आवश्यक असेल | |
| | (एक) | महानगरपालिकेचा तपशील | पुणे महानगरपालिका. |
| | (दोन) | महानगरपालिकेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटीत करण्यात आलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषद, समित्या व इतर निकष दर्शविणारे विवरणपत्र – त्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत. | नगर अभियंता यांच्या नियंत्रीखाली असलेल्या व उप आयुक्त झोन क्र. २, कै. ढोले पाटील कार्यालयातंर्गत करण्यात येत असलेल्या बांधकाम नियंत्रण विकास योजना खात्याची संक्षिप्त माहिती परिशिष्ट ‘अ’ मध्ये जोडली आहे. |
| | (तीन) | तिळा अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका | सर्व सेवकांची यादी सोबत जोडली आहे परिशिष्ट ‘ब’. |
| | (चार) | महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा प्राधिकाऱ्यापत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे तपशील : | बांधकाम परवानगी आणि नगर अभियंता विभागाकडे कामकाज करणेसाठी संबंधित सेवकांना देण्यात आलेली अधिकार सुपूर्ती परिशिष्ट ‘क’ मध्ये जोडली आहे. |
| | (पाच) | प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत, त्या तिमाहिचा लेखापरिक्षित ताळेबंद ज्या व खर्च, आणि पैशाचा ओघ (Cash Flow) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र, आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्र. | नगर अभियंता यांचे नियंत्रीखाली असलेल्या वॉर्ड स्तरावर विकेंद्रीत करण्यात आलेल्या बांधकाम विभाग विकास योजना विभागातर्फे मुख्यत्वे आराखडा अंमलबजावणीचे काम करण्यात येत आहेत. विकास काम या खात्यामार्फत करण्यात येत नाहीत. त्यामुळे सबब तक्ते निरंक आहेत. |
| क्र | | कलम ६० (अ) (३) | माहिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | (सहा) | महानगरपालिका पुरवत असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र. | खात्याची संबंधित माहिती परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केली आहे. |
| | (सात) | सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवो पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरित केलेल्या रकमांबाबतचा अहवाल. | वॉर्ड स्तरावर विकेंद्रीकरण केलेल्या बांधकाम व विकास योजना खात्याशी संबंधित येत नाही. |
| | (आठ) | महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसहाय्य कार्यक्रमांचा तपशील आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रीत व निकष. | सदर बाब नगर अभियंता नियंत्रणाखालील बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभागाशी संबंधित नाही. |
| | (नऊ) | महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेच्या किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशील. | मंजूर विकास आराखड्याबाबत स्वतंत्र टिपणी परिशिष्ट 'ड' (नवीन) |
| | (दहा) | राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, विनिदिष्ट करेल असे, प्रमुख बांधकामांचे तपशील, तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील यांबाबतची माहिती. | बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभागातर्फे विकास कामे करण्यात येत नसल्याने माहिती निरंक आहे. |
| | (अकरा) | महानगरपालिका निधीचा तपशील, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींव्दारे मिळालेले उत्पन्न. | सन २००७–०८<br>जमा रक्कम रू. ३५४.६७ कोटी<br>सन २००८–०९<br>जमा रक्कम रू. २६९.०९ कोटी<br>सन २००९–१०<br>जमा रक्कम रू. २७७.०० कोटी |
| | | (अ) कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन्स व परवानगी यातून मिळणारी फी. | या खात्याशी संबंधित येत नाही त्यामुळे सदर माहिती निरंक आहे. |
| | | (ब) वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन्स व परवानगी यांतून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामागाची कारणे. | या खात्याशी संबंधित येत नाही त्यामुळे सदर माहिती निरंक आहे. |
| | | (क) राज्य शासनाने वसुल केलेल्या करांचा महानगरपालिककेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने. | या खात्याशी संबंधित येत नाही त्यामुळे सदर माहिती निरंक आहे. |

| क्र | | कलम ६० (अ) (३) | माहिती |
|---|---|---|---|
| | | (ड) महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा | या खात्याशी संबंधित येत नाही त्यामुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तिच्याकडे सोपविलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने त्यांचे स्वरूप आणि विनियोगाची मर्यादा. | सदर माहिती निरंक आहे. |
| | | (इ) जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने मार्फत उभा केलेला पैसा | या खात्याशी संबंधित येत नाही त्यामुळे सदर माहिती निरंक आहे. |
| | (बारा) | प्रत्येक प्रभागाला निवयवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद. | या खात्याशी संबंधित येत नाही त्यामुळे सदर माहिती निरंक आहे. |
| | (तेरा) | विहित करण्यात येईल अशी इतर माहिती | निरंक |

मा.स. कळावे

**कार्यकारी अभियंता,**
बांधकाम नियंत्रण विभाग झोन क्र. २,
कै.बा.स.ढोले पाटील कार्यालय,
पुणे महानगरपालिका

## परिशिष्ट "अ"

**नगर अभियंता यांच्या नियंत्रणाखाली,**
**कै. ढोले पाटील कार्यालय झोन क्र.२**
**पुणे महानगरपालिका**

नगर अभियंता यांचे नियंत्रणाखाली क्षेत्रिय कार्यालय स्तरावर बांधकाम नियंत्रण, विकास योजना विभाग येत आहेत. तसेच नगर अभियंता हे सर्व तांत्रिक विभागाचे मुख्य नियंत्रक आहेत.

१. यापूर्वी बांधकाम नियंत्रण व विकास योजना हे दोन्ही विभाग स्वतंत्र होते, आता या दोन्ही विभागांचे एकत्रिकरण करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे या विभागाचे काही प्रमाणात विकेंद्रीकरण केलेले असून २००० चौ.मी. आतील क्षेत्राचे बांधकाम परवानगी विषयक कामकाज क्षेत्रिय आयुक्त, कार्यालयाकडील बांधकाम विभागाकडे झालेले आहे. वॉर्ड स्तरावर विकेंद्रीकरण करण्यात आलेल्या बांधकाम नियंत्रण विभागामार्फत बांधकामास परवानगी देणे, झोनिंग डिमार्केशन, विकास योजना अभिप्राय व इतर तद्नाषिक काम केले जात आहे.

२. बांधकाम परवानगी विषयक कामकाज एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ विकास नियंत्रण नियमावली या कायद्यांअंतर्गत चालते.

३. कामकाजाचे स्वरूप :

(अ) विविध झोनमधील प्लॉटचे एकत्रिकरण अथवा विभागणीचे प्रस्ताव मान्य करणे. त्या अनुषंगाने इमारतींचे लेआऊट प्रस्ताव मान्य करणे. मान्य लेआऊट मधील तसेच लहान क्षेत्रफळाचे बांधकाम परवानगी प्रस्ताव मान्य करणे. जोते तपासणी दाखला देणे इमारतींचे बांधकाम पुर्ण झाल्यावर पार्ट अथवा पुर्ण भोगवटापत्र देणे मान्य नकाशा व्यतिरिक्त अथवा अनधिकृत बांधकामांना २०००.०० चौ.मी. क्षेत्राखालील मिळकतीतील बांधकामांना नोटीसा देऊन पाडण्याची कारवाई करणे. धोकादायक बांधकामावर कारवाई करणे इ.

(ब) विकास आराखडा अनुषंगाने डी.पी. अभिप्राय देणे, झोनिंग डिमार्केशन देणे, विकास आराखड्याप्रमाणे जागेवर रस्तारूंदी आखून देणे, आरक्षित क्षेत्राचा ताबा घेताना आरक्षणे आखणे व त्यानुसार संयुक्त योजना विषयक कामकाज करणे.

(क) विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत जमिन मालक विकसित करू शकणाऱ्या आरक्षणावरील प्रस्तावांना आर– ७ अंतर्गत म.न.पा.चे ताब्यात येणारे गाळे/दुकाने/ऑफिसेस/मॅटर्निटी होम इ. बाबत आवश्यक ते करारनामे करणे.

४. जलदगती बांधकाम परवानगी : विहित नमुन्यात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह/अभिप्रायांसह अर्ज दाखल केल्यास ६० दिवसांच्या आत बांधकाम परवानगी देणे बंधनकारक आहे.सदर कालावधी कमी करणेसाठी आणि प्रस्तावांमध्ये सर्व आवश्यक कादगपत्रांची पूर्तता असल्यास त्वरित बांधकाम परवानगी देण्यात यावी. याकरिता जलदगती बांधकाम परवानगी विभाग सन २००३ पासून सुरू करण्यात आलेला आहे. यामध्ये २४ तासांच्या आत बांधकाम परवानगी प्रस्ताव मान्य करण्यात येत आहेत. यामध्ये लायसेन्स आर्किटेक्टकडून हमीपत्र घेऊन ७५% चटईक्षेत्र मर्यादेपर्यंत प्रस्ताव मान्य करण्यात येत आहेत.

५. संगणकीकरण : विकास नियंत्रण नियमावली नुसार बांधकाम परवानगी प्रस्तावांची छाननी करतांना सर्व नियमांचे अचुकपणे पालन करण्यात यावे, त्याचप्रमाणे मान्य करण्यात येणाऱ्या नकाशांमध्ये तांत्रिक अचुकता यावी यासाठी ऑटोडीसीआर/प्रिडीसीआर सॉफ्टवेअर खात्याने विकसित केले असून सर्व प्रस्तावांच्या कागदपत्रांची आणि नकाशांची संगणकीय छाननी या सॉफ्टवेअरमध्ये करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कोणताही प्रस्ताव कधी दाखल झालेला आहे, कधी मान्य करण्यात आलेला आहे अथवा आक्षेपास्तव फेटाळण्यात आलेला आहे. याची अद्ययावत माहिती संगणकावर उपलब्ध झालेली आहे. लंडन येते वर्ल्ड लिडरशिप फोरम अंतर्गत स्पर्धामध्ये या संगणक प्रणालीस प्रथम पारितोषिक मिळालेले आहे. त्याचप्रमाणे विविध राज्यातील महानगरपालिका वापर करण्यासाठी पुणे म.न.पा.कडून मार्गदर्शन घेत आहेत.

६. वाढीव एफएस.आय. प्रस्ताव शासन नियमावलीनुसार आय.टी.हॉस्पिटल धर्मादाय संस्था संचालित शैक्षणिक वापर, चार तारांकित हॉटेल इ. करिता वाढीव एफएस.आय. प्रिमियम घेवून मान्य करण्यात येतो.

७. इको हौसिंग पॉलिसी : पर्यावरण पुरक गृहप्रकल्पांना प्रोत्साहन देणेसाठी पुणे म.न.पा.ने इको हौसिंग पॉलिसी तयार केलेली आहे. यासाठी तज्ञ सल्लागारांची नेमणूक केलेली असून हे गृहप्रकल्प इको हौसिंग पॉलिसी अंतर्गत निकषांचे पालन करणार आहेत अशा प्रकल्पांना प्रिमियम रकमेमध्ये सवलत देण्यात येत आहे.

८. बांधकाम परवानगी/विकास योजना लेआऊट शुल्क/प्रिमियम आकारणी लेआऊट प्रस्ताव मान्य करतांना/बांधकाम परवानगी प्रस्ताव मान्य करतांना/तसेच इमारतीअंतर्गत विविध क्षेत्र चटईक्षेत्र मुक्त करतांना खालील विहित प्रिमियम आकारण्यात येत असतात.

अ) जमिन विकास शुल्क र.रू. ६०/– प्रति चौ.मी./निवासी
औद्योगिक जमिन विकास शुल्क र.रू. ९०/– प्रति चौ.मी./औद्योगिक
जमिन विकास शुल्क र.रू. १२०/– प्रति चौ.मी. /व्यापारी

ब) बांधकाम परवानगी शुल्क र.रू. ६०/– प्रति चौ.मी. निवासी
र.रू. ९०/– प्रति चौ.मी. औद्योगिक
र.रू. १२०/– प्रति चौ.मी. व्यापारी

क) प्रिमियम आकारणी :
बाल्कनी प्रिमियम, जिना, पॅसेज, लिफ्ट मशीनरूम प्रिमियम हार्डशिप प्रिमियम अंतर्गत रस्ता चटईक्षेत्र प्रिमियम, राडारोडा चार्जेस, स्क्रुटीनी फी, सुरक्षा ठेव इ. प्रिमियम त्या त्या वर्षातील रेडिरेकनरच्या टक्केवारीच्या प्रमाणात आकारण्यात येत असतात.

९. हे कर्मचारी संवर्ग रचना तांत्रिक उप आयुक्त, झोन क्र. २ कार्यालयांतर्गत क्षेत्रिय कार्यालय स्तरावर काम करत आहेत.

कार्यकारी अभियंता १
उप अभियंता (बां.नि./वि.यो.) ३
दु./क अभियंता (बां.नि./वि.यो.) ४
तांत्रिक सहाय्यक ३

## परिशिष्ट "ब"

| हुद्दा | क्र. | पदाचे नाव | कार्यालयाचा पत्ता | दूरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|
| कार्यकारी अभियंता | १ | श्री. गणपत काशिनाथ साळंके | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| उप अभियंता | १ | श्री. भांगरे शिरिष | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| | २ | श्री. दिलीप पावरा | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३ | श्री. रजपुत डी.एन. | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| दुय्यम अभियंता/ | १ | श्री. नानासाहेब रंधवे | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| कनिष्ठ अभियंता | २ | श्री. लखानी कन्हैय्यालाल | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| | ३ | श्री. नागटिळक सी.टी. | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| आरेखक/अनुरेखक | १ | श्री. संजय थोरात | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| | २ | श्री. पंडीत बहिरम | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| | ३ | श्री. सुरेंद्र चिंचोलीकर | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| ज्यु.ग्रे.लेखनिक | १ | श्री. रविंद्र जगदाळे | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| शिपाई/बिगारी | १ | शेळकंदे मच्छिंद्रनाथ | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| | २ | साळवी संतोष | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| | ३ | श्री. जगताप अरूण | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| | ४ | श्री. बाळासाहेब खरात | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| | ५ | श्री. भानुदास ठोंबरे | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |
| | ६ | श्री. सचिन काळंगे | कै. ढोले पाटील कार्यालय, पुणे म.न.पा. | |

## “ड”

## डि.पी.सेल व्हिजन

## पुणे म.न.पा. नवीन हद्द

१. सिटी सर्व्हेक्षण : पुणे शहराच्या हद्दीवाढीमधील २३ गावांचे सिटी सर्व्हेचे काम खाजगी संस्थामार्फत्त चालू असून सदर काम भूमिअभिलेख कार्यालयाच्या देखरेखीखाली चालू आहे. सदरचे काम संगणीकृत होणार आहे. सदर कामाचा उपयोग विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी होणार असून झोनिंग डिमार्केशन देणे, मिळकतीच्या हद्दीबाबतचे सदर आरक्षणच्या जागा ताब्यात घेणे, तसेच मिळकतीच्या मालकीबाबतचे जागा ताब्यात घेणे. तसेच मिळकतीच्या मालकीबाबतचे अद्यावत रेकॉर्ड तयार होणार असल्याने सदर कामाचा उपयोग विकास आराखडा अंमलबजावणीसाठी होणार आहे.

२. पुणे शहर जुन्या हद्दीचा विकास आराखडा : पुणे शहर जुन्या हद्दीतील विकास आराखड्याचे पुनरावलोकनाचे काम एम.आर.टी.पी. ॲक्टचे कलम ३८ अन्वये चालू असून त्या अनुषंगाने विविध सर्वेक्षणाची कामे चालू आहेत. सदर सर्वेक्षणाचे कामाचे पृथ:करण करून प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. तसेच विकास आराखडा अंमलबजावणीच्या दृष्टिने नवीन विकास नियंत्रण नियमावली तयार करण्यात येणार आहे.

३. पुणे शहर नवीन हद्दीचा विकास आराखडा : पुणे शहर वाढीव हद्दीचा विकास आराखडा एम.आर.टी.पी. ॲक्टचे कलम ३० अन्वये विकास आराखडा शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. शासनाने त्यास अंशत: मान्यता दिली आहे.

४. इकोहौसिंग : पुणे शहरामध्ये पर्यावरणापुरक बांधकामांना चालना देण्यासाठी पुणे म.न.पा.ने इको हौसिंग संकल्पना सुरू केली आहे. याकरिता सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्क यांची नेमणूक केली असून त्यांचेमार्फत पर्यावरण प्रकल्पांची छाननी करते व सदर प्रकल्पांना चालना देण्यासाठी म.न.पा. तर्फे प्रिमियममध्ये सवलत देण्यात येते. सदर प्रकल्पांमध्ये वाढ होण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्यात येणार आहे.

नगर अभियंता खात्याकडे दाखल होणाऱ्या बांधकाम/रेखाकंन संमती प्रस्तावाच्या छाननीकरिता तयार करण्यात आलेल्या Autodcr या संगणक प्रणालीची अंमलबजावणी २००५ सालापासून करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणालीच्या अंमलबजावणीच्या टप्प्यामध्ये नजिकच्या काळात Digital Signature चा वापर करण्याचे उद्दिष्ट आहे, बांधकाम संमती प्रस्तावाच्या छाननी/मान्यतेच्या क्रमपध्दतीमध्ये संबंधित अधिकारी संवर्गास Digital Signature देण्यात येणार आहेत. तसेच ला.आर्किटेक्ट/इंजिनिरर्स यांना देखील Digital Signature चा वापर क्रमप्राप्त करावा लागणार आहे.

संगणक प्रणालीमध्ये Digital Signature च्या वापरामध्ये User Autheticalltion होणार आहे. त्यामुळे user access security अंमलात येणार आहे.

तसेच Online building proposal Submission याचा वापर सद्य:स्थितीमध्ये सुरू करण्यात आलेला असून त्यामध्ये २४ तासाचे आत प्रस्तावांचे छाननी अहवाल संबंधित आर्किटेक्ट/इंजिनिरर यांना Web site व्दारा पाहता येतील.

जी.आय.एस. यानंतर संमत झालेले बांधकाम संमती प्रस्ताव हे GIS च्या सहाय्याने पुणे शहराच्या बेसमॅप वर बसविणे व त्याची माहिती अद्यावत करण्याचे काम करावयाचे आहे. या पध्दतीमध्ये पुणे म.न.पा. तर्फे विविध ठिकाणी संमत होणारे बांधकाम प्रस्ताव हे त्यांचे graphically represent करता येतील GIS tool वापर करून विविध स्वरूपाच्या quarries सोडवता येतील. सदर प्रस्तावा संदर्भातील आवश्यक माहिती इतर खात्यांना उपलब्ध करून देता येईल.